जा. क्र.कोजिप/शिक्षण/प्राथ./वशि/१०/२५३/२०१४
शिक्षण विभाग प्राथमिक,जिल्हा परिषद,कोल्हापुर
दिनांक -२५/०६/२०१४.

प्रति,
अध्यक्ष / सेक्रेटरी
शिक्षण समिती कसबा नेसरी,
ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

विषय - स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन)अधिनियम २०१२ अन्वये सन २०१३-२०१४ या शैक्षणिक वर्षापासुन नवीन प्राथमिक शाळेस प्रथम मान्यता देणे.

संदर्भ - १)महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, यांचा शासन निर्णय क्र.स्वयंअ -२०१३/(८५/१३) माशि १/मंत्रालय, मुंबई ३२, दि.१५ जून २०१३.
२) मा. शिक्षण उपसंचालक,कोल्हापूर विभाग कोल्हापूर यांचे परवानगी पत्र जा.क्र प्राथ२/ कोवि/स्वंअशा/पर/१३-१४/३९५४८-७१३, दि.०८/१०/२०१३.
३) गट शिक्षण अधिकारी, पंचायत समिती गडहिंग्लज यांचा तपासणी अहवाल दि.२५/०३/२०१४. संस्थेचे पत्र दि ०३/०३/२०१४.

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भ क्र.१ व २ ने आपल्या संस्थेस एस.एस. इंग्लिश मेडियम प्राथमिक व उच्च प्राथमिक स्कूल, नेसरी, ता. गडहींग्लज येथे इंग्रजी माध्यम खाजगी प्राथमिक शाळा सुरु करणेस परवानगी प्राप्त झालेली आहे. संदर्भ क्र. ३ ने १ ते १७ मुद्दयांचा तपासणी अहवाल प्रमाणपत्रासह प्राप्त झाला आहे.संस्थेने स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अन्वये दाननिधी मूळ पावती या कार्यालयाकडे सादर केली असल्याने व नोंदणीकृत भाडे करारपट्टा सादर केला असल्याने, शाळेच्या इयत्ता १ ली ते ७ वी च्या वर्गाना (फक्त एका तुकडीस) जुन २०१३ पासून प्रथम मान्यता देणेत येत आहे.

**शिक्षणाधिकारी,(प्राथमिक)**
**जिल्हा परिषद कोल्हापूर**

प्रत,
१. मा. शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांना माहितीसाठी सविनय सादर
२. गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, गडहिंग्लज यांना कार्यवाहिसाठी.